<u>नियमीत दिवाणी दावा क्र.२९८/२०२२ – निशाणी २६ खालील आदेश</u>

संजय रावसाहेब आगलावे वि. रासाहेब जयाप्पा आगलावे

CNR NO. MHSO20-001083-2022

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, वादीतर्फे निशाणी क्र.२१ वर अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र.३ ते ११ यांची नावे दाव्यातून वगळण्यात यावी अशी मागणी केली होती. सदरचा अर्ज मंजूर झालेला आहे. दाव्यात प्रतिवादी क्र.३ म्हणून गोरख सदाशिव तरंगे व प्रतिवादी क्र.१२ गोरखनाथ तुळशिराम बंडगर यांचे नाव नमूद आहे. नि.२१ चा दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करतेवेळी मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.१२ गोरख तुळशिराम बंडगर यांचे नाव दाव्यातून वगळणे आवश्यक होते. परंतू प्रतिवादी क्र.३ व १२ यांचे नावातील साधर्मामुळे अनावधानाने व नजरचुकीने नि.२१ वरील अर्जात प्रतिवादी क्र.३ गोरख सदाशिव तरंगे यांचे नाव वगळण्यात आलेले आहे. वास्तविक दावा मिळकतीसंदर्भात गोरख सदाशिव तरंगे हे आवश्यक पक्षकार आहेत व प्रतिवादी क्र.१२ गोरखनाथ तुळशिराम बंडगर हे दावा मिळकती संदर्भात आवश्यक पक्षकार नाहीत. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दावा शिर्षकात प्रतिवादी क्र.२ नंतर प्रतिवादी क्र.३ असे नमूद करुन अर्जात नमूद केलेप्रमाणे गोरख सदाशिव तरंगे यांना दाव्यात पक्षकार करणेस परवानगी मिळावी व प्रतिवादी क्र.१२ गोरखनाथ तुळशिराम बंडगर यांचे नाव दावा शिर्षकातून वगळणेस परवानगी मिळणेची विनंती केली. सदर दावा दुरुस्ती ही केवळ तांत्रिक स्वरूपाची असून सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे आशयात व विषयात कोणताही बदल होत नाही. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे मांडले की, सदरचा वादीचा अर्ज खोटा, लबाडीचा व दिशाभुल करणारा असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादीचे अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेचा दाखल केलेला आहे. दाव्याचे अवलोकन करता वादीने निशाणी क्र.२१ कडे प्रतिवादी क्र.३ ते ११ यांचे नाव दाव्यातून वगळणेबाबत अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज मंजूर

झालेला आहे. सदर आदेशाची पुर्तता करतेवेळी प्रतिवादी क्र.३ व १२ यांचे नावातील साधर्मामुळे प्रतिवादी क्र.१२ यांचे नाव वगळण्याऐवजी प्रतिवादी क्र.३ यांचे नाव नजरचुकीने वगळण्यात आले आहे. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दावा शिर्षकात प्रतिवादी क्र.२ नंतर प्रतिवादी क्र.३ गरेख सदाशिव तरंगे यांना नमुद करण्याची व प्रतिवादी क्र.१२ गोरखनाथ तुळशिरम बंडगर यांचे नाव वगळणेबाबत दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. सदरची दुरुस्ती होणे अत्यंत जरूरीचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे आशयात व विषयात कसलाही बदल होत नाही. त्यामुळे सदर दाव्यात वादीने मागितलेली दुरुस्ती करणे जरुरीचे आहे.

६. सदर दुरुस्ती पुरावा सुरु होण्यापूर्वी मागितली आहे. सदरची दुरुस्ती होणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे त्याला अनुषंगून वादीने मागितलेली मागणी मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेकरीता वादीने मागणी केलेली दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरील दुरुस्तीमुळे दाव्याच्या आषयात व विषयात कोणताही बदल होणार नाही. ही सर्व परिस्थीती पहाता अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज (नि.२६) मंजूर करण्यात येतो.

२. सदर आदेशाच्या दिनांकापासून वादी यांनी अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती करुन, दुरुस्ती प्रत १४ दिवसांचे आत हजर करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.04.02 17:01:12 +0530

सांगोला.
दिनांक : ०१/०४/२०२६

(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Civil Judge, J.D. & J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 02-04-2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 02-04-2026 |